# जावडेकर अँड असोसिएट्सतर्फे वाकडला पर्यावरणपूरक प्रकल्प

सकाळ वृत्तसेवा

पिंपरी, ता. २० : पुण्यातील विलास जावडेकर अँड असोसिएट्स या कंपनीच्या वतीने वाकड येथे पहिला पर्यावरणपूरक, सर्व सुविधांनी सज्ज असा 'इको फ्रेंडली' गृहप्रकल्प उभारण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. परंपरागत बांधकाम रचना आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हे प्रकल्पाचे वैशिष्ट्य आहे, असे कंपनीचे संचालक आदित्य जावडेकर यांनी आज 'सकाळ'शी बोलताना सांगितले.

'पलाश-द ग्रीन कम्यून' या नावाने आठ एकर जागेत हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. त्यात साडेतीनशे फ्लॅट्स, पेंट हाऊस, डुप्लेक्सचा समावेश आहे. या प्रकल्पाच्या रचनेपासून अनेक पर्यावरण तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात आला आहे, त्यामुळे पर्यावरण संरक्षणविषयक आवश्यक त्या सुविधा घराच्या भिंतीपासून, खिडक्या, दारांची रचना, रंगसंगतीसाठी करण्यात येणार आहे. त्यामुळे उन्हाळ्यात घरात गारवा आणि थंडीत उबदार वातावरण राहील, असा त्यांचा दावा आहे.

पाण्याचा पुनर्वापर, रेनवॉटर हार्वेस्टिंग, पवन, सौर, बायोगॅस आदी ऊर्जा साधनांचा वापर, कचऱ्याची खास प्रकारे विल्हेवाट लावण्याची व्यवस्था प्रकल्पात करण्यात येत आहे. वेगळ्या पद्धतीचे सुरक्षित पार्किंग, मुलांना खेळण्यासाठी भरपूर जागा ही प्रकल्पाची वैशिष्ट्ये असून, आवश्यक तेथे खास तज्ज्ञांचा सल्ला घेऊन वेगवेगळ्या प्रकारच्या रोपांचे रोपण करण्यात येणार आहे. एकाच ठिकाणी पर्यावरण संबंधित सर्व सुविधा एकत्रित देणारा हा पहिलाच प्रकल्प आहे, असे त्यांनी सांगितले.